महाराष्ट्र शासन

क्रमांक : बीएलएस १००२/(५२७/२००२)/प्राशि-३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : [illegible]

प्रति.
विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे / नाशिक

**विषय : सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त इतर माध्यमाच्या (मराठी) खाजगी प्राथमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत**

सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षी परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या २ शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ ली चा वर्ग (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त इतर माध्यमाच्या (मराठी) खाजगी प्राथमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास जून २००० पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे. शासनाचा हा निर्णय संस्थेस तात्काळ कळविण्यात यावा.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| | **जिल्हा - पुणे** | | |
| १. | श्री शंभू महादेव देवस्थान ट्रस्ट, फुरसुंगी, ता.हवेली, जि.पुणे | भेकराईनगर, फुरसुंगी, ता.हवेली, जि.पुणे | मराठी |
| | **जिल्हा - ठाणे** | | |
| २. | विद्या प्रसारक मंडळ, बेलापूर, नवी मुंबई, जि.ठाणे | बेलापूर, जि.ठाणे | मराठी |

२. सदर परवानगी शासनपत्र क्र. बीएलएस २०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि-३, दि.१६ सप्टेंबर, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे. परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्य काळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही, असे हमीपत्र संस्थेकडून प्रथम लिहून घ्यावे व सदर हमीपत्र आपल्या कार्यालयातील संबंधित नस्तीवर कायम स्वरुपी जतन करुन ठेवावे व त्याच्या छायांकित प्रती प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात याव्यात. त्याची एक प्रत शासनास माहितीस्तव सादर करावी.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी तसेच शासनपत्र क्र.बीएलएस २०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या

अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळांना प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास पाठवावा.

४. सदर प्राथमिक शाळांना शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळांना परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

(सही)

( वि. व. चिंदरकर )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे/ठाणे
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक

निवड नस्ती, प्राशि-३